# मुंबई विद्यापीठ

पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष,
परीक्षा विभाग
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई - ४०० ०९८
दि. १९/८/२०१९

क्र. परीक्षा / पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष/ ९६३ /२०१९.

परिपत्रक :-

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे संचालक/प्रमुख विद्यापीठाशी संलग्नित/संचालित/स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण परिक्षेत्राचे समन्वयक/संचालक, आपणास कळविण्यात येते की, प्रथम सत्र २०१९ मध्ये विद्यापीठाने घेतलेल्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांमध्ये **(T.Y.B.Com (Sem-VI) (Choice Based) (वगळून)** जे विद्यार्थी आपल्या संबंधित **अभ्यासक्रमांच्या प्रथम / द्वितीय वर्षासाठी ७ Grade Point System प्रमाणे प्रविष्ठ झालेले होते व तृतीय वर्षाला १० Grade Point System** प्रमाणे प्रविष्ठ झालेत अशा विद्यार्थ्यांचे निकाल राखिव ठेवण्यात आले होते, हे राखीव ठेवलेले निकाल नुकतेच जाहिर करण्यात आलेले आहेत; अशा विद्यार्थ्यांचे पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रतीसाठींचे **अर्ज सॉफ्ट कॉपी (सी.डी.) व हार्ड कॉपी (पारंपारीक अर्ज) स्वरुपात परिपूर्णरित्या भरून संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या सही शिक्यानिशी विहित शुल्कासह परीक्षा विभागातील पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष, रुम नं. ४७, दुसरा मजला येथे स. ११.०० ते दु. २.३० या वेळेत हस्तेपोच सादर करावेत ही विनंती.**

विद्यापीठाकडे पुनर्मुल्यांकनासाठीचे वरील प्रमाणे अर्ज पाठविताना अर्ज परिपुर्णरित्या व अचूक भरलेले आहे याची खात्री करून घ्यावी. अर्ज अपूर्ण भरलेला व अर्जात चुकीची माहिती असल्यास व यामुळे भविष्यात काहि बाबी उद्‌भवल्यास त्यास संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील. याची कृपया नोंद घ्यावी.

उपरोक्त अर्ज स्वीकारण्याचा कालावधी खालील प्रमाणे आहे:-

**विद्यार्थ्यांकडून अर्ज स्विकारण्याचा कालावधी - दि. २० ऑगस्ट २०१९ ते २८ ऑगस्ट, २०१९.**

**अर्ज व विहित शुल्क विद्यापीठाकडे सादर करण्याचा कालावधी - दि. ३० ऑगस्ट,२०१९ पर्यंत.**

अर्ज स्वीकारण्याची वरील मुदत संपल्यांनंतर कोणत्याही परिस्थितीत अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

**उपरोक्त प्रमाणेच्या अर्जासाठींच्या शुल्काचा तपशील :-**

| खुल्या प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी | राखीव प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी (Those who get concession in tution fees and other fees) |
|---|---|
| अर्ज शुल्क :- रू. १०/- | रू. १०/- |
| पुनर्मुल्यांकन शुल्क :- रू. २५०/- | रू. १२५/- |
| छायांकित प्रत शुल्क :- रू. ५०/- | रू. २५/- |

तरी उपरोक्त बाबीची सर्व संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी तसेच ह्या बाबी सर्व संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात ही विनंती.

19.8.19

संचालक/कुलसचिव,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

स्थळ : मुंबई
दिनांक : १९ ऑगस्ट, २०१९

अ. प्रत:-
विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे संचालक/प्रमुख विद्यापीठाशी संलग्नित/संचालित/स्वायत्त महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण परिक्षेत्राचे समन्वयक/संचालक.